**L. A. BILL No. CIII OF 2025.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०३.**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९५८ चा ६०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील, अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ३२क ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) कलम ३२क मधील, " कलम ३२-ब" या मजकुराऐवजी, "कलमे ३२ब आणि ५३ब" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९५८ चा ६०.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ५३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५३ मध्ये, पोट-कलम (१अ ) मधील, "आणि अशा प्रकारे देण्यात आलेला आदेश अंतिम असेल" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ५३अ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५३अ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "लेख हजर करण्यास फर्मावू शकेल" या मजकुराऐवजी, "कलम ५३ब अन्वये ज्याच्या बाबतीत राज्य शासनासमोर अपील दाखल केलेले असेल त्या लेखांव्यतिरिक्त त्याच्यासमोर इतर लेख हजर करण्यास फर्मावू शकेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० मध्ये नवीन कलम ५३ब समाविष्ट करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५३अ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

राज्य शासनाकडे अपील.

"**५३ब.** कलम ५३ च्या पोट-कलम (१अ) अन्वये दाखल केलेल्या अपिलात मुख्य नियंत्रण महसूल प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, एक हजार रुपये शुल्कासह लेखी अर्जाद्वारे, अशा आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे अपील दाखल करू शकेल, आणि राज्य शासन, पक्षकारांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, प्रकरणाचा विचार करील आणि त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश त्यावर देईल आणि अशा प्रकारे पारित केलेला आदेश अंतिम असेल.".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

मुद्रांक शुल्काचे अभिनिर्णय, अपुरे मुद्रांक शुल्क भरलेले लेख, मूल्यांकन आणि मुद्रांक शुल्काचा परतावा यासंबंधात, प्रकरण तीन, प्रकरण चार, प्रकरण पाच व कलम २७ च्या दुसऱ्या परंतुकाच्या खंड (अ) यां खालील जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, अशा आदेशाविरुद्ध मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करू शकेल आणि अशा अपिलांमध्ये मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने दिलेले आदेश अंतिम असतील अशी तरतूद, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) याच्या कलम ५३(१अ) मध्ये केलेली आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम ५३(१अ) अन्वये मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशांना, रिट अधिकारितेमध्ये केवळ उच्च न्यायालयासमोर आव्हान देता येते. अशा मोठ्या संख्येतील याचिका उच्च न्यायालयासमोर दाखल केल्या जात असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात शासनाचा महसूल अंतर्भूत असतो. त्यामुळे, उच्च न्यायालयावरील भार वाढतो आणि व्यथित पक्षकारांचा विवाद खर्च देखील वाढतो. अशी प्रकरणे उच्च न्यायालयासमोर प्रलंबित राहत असल्याने, शासनाच्या महसुलाची रक्कम मोठ्या प्रमाणात दीर्घकाळासाठी अडकून राहते.

म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ५३(१अ) अन्वये मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, अशा आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे अपील दाखल करू शकेल अशी तरतूद करण्यासाठी उक्त अधिनियमात सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते. त्या प्रयोजनार्थ, उक्त अधिनियमामध्ये नवीन कलम ५३ब समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**३.** ज्या प्रकरणांमध्ये राज्य शासनासमोर अपिले दाखल केली जातात अशा प्रकरणांमधील पुनरक्षण करण्यास रोध करण्याकरिता मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याद्वारे केल्या जाणाऱ्या पुनरीक्षणाशी संबंधित असणाऱ्या तरतुदींमध्ये, कार्यवाहीची द्विरुक्ती टाळण्यासाठी परिणामस्वरूप सुधारणा करण्याचे देखील प्रस्तावित आहे.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक ९ डिसेंबर, २०२५.

**चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतभूत आहे :—

**खंड १(२)**.— या खंडान्वये, ज्या दिनांकास अधिनियम अंमलात येईल तो दिनांक, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**२.** वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचा आहे.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०३ महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) २०२५.**

**( महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५७ यातील उतारे)**

**(सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६०)**

**१. ते ३२.** ** ** **

**३२-अ. व ३२-ब.** ** ** **

**३२-क.** कलम **३२-ब** च्या तरतुदींच्या आणि राज्य शासनाकडून याबाबतीत तयार करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीन राहून, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, स्वाधिकारे, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमांन्वये, कोणत्याही अधिकाऱ्याकडून काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचा (अपिलामध्ये काढण्यात आलेल्या आदेशासह) अभिलेख मागवू शकेल आणि त्याची तपासणी करू शकेल आणि त्यावर, त्याला न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश काढू शकेल; आणि असा काढलेला आदेश अंतिम असेल आणि तो आदेश, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे प्रश्नास्पद करता येणार नाही : पुनरीक्षण.

परंतु पुनरीक्षण करावयाचा आदेश कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडून या कलमान्वये अभिलेख मागविण्यासंबंधीची कोणतीही नोटीस बजविण्यात येणार नाही अशा दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याखाली उक्त प्राधिकाऱ्याकडून पुनरीक्षणाचा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, अशा व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम होईल असा कोणताही आदेश या कलमान्वये काढण्यात येणार नाही.

**३३. ते ५२.** ** ** **

**५३(१).** ** ** **

(१-अ) प्रकरण तीन प्रकरण चार, प्रकरण पाच आणि कलम २७ च्या दुसऱ्या परंतुकाचा खंड (अ) याखाली जिल्हाधिकाऱ्याने काढलेल्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, तीनशे रुपये फी भरून लेखी अर्जाद्वारे अशा आदेशाच्या विरुद्ध मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करू शकेल, आणि तो, पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर त्या प्रकरणाचा विचार करील आणि त्यावर त्याला योग्य आणि न्याय्य वाटेल असा आदेश देईल आणि अशा प्रकारे देण्यात आलेला आदेश अंतिम असेल. मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याचे नियंत्रण व प्रकरणाचे कथन त्याच्याकडे पाठविणे.

(२) व (३) ** ** **

**५३- अ.** (१) कलम ३२ चे पोट-कलम (३), कलम ३९ चे पोट-कलम (२) आणि कलम ४१ चे पोट-कलम (२) यांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, जिल्हाधिकाऱ्याने चुकून किंवा अन्यथा कोणत्याही संलेखावर बसविण्यायोग्य शुल्कापेक्षा यथास्थिति कमी शुल्क आकारले असेल किंवा तो संलेख शुल्क आकारणीपात्र नाही असे त्याने ठरविले असेल तेव्हा, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यथास्थिति, कलमे ३२, ३९ किंवा ४१ खालील जिल्हाधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या आत, संबंधित पक्षकारास तो संलेख सादर करण्यास फर्मावू शकेल आणि पक्षकाराला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्या संलेखावर कोणतेही शुल्क आकारणीपात्र आहे किंवा नाही अथवा त्यावर बसवलेले कोणतेही शुल्क कमी आहे किंवा कसे याची तपासणी करू शकेल आणि कोणतेही कमी शुल्क आकारले गेले असल्यास अशी तुटीची रक्कम संबंधित पक्षकाराकडून वसूल करण्याचा आदेश देऊ शकेल. शुल्काची अशी तुटीची रक्कम देण्यात आल्यानंतर संलेखावर पृष्ठांकन करण्यात येईल. कलमे ३२, ३९ व ४१ खालील जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयाचे पुनरीक्षण.

(२) ** ** **

**५४. ते ७६.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

し

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०३.]**

**[ महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव ( १ ),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.